# भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित, पुणे.

स्वप्न अर्थपूर्ण करणारी बँक

मुख्य कचेरी : निवेदिता भवन, सीटीएस नं. ३४/७, फायनल प्लॉट नं. ३५/७बी, प्रभात रोड, लेन नं. ८, एरंडवणा, पुणे ०४. फोन नं. ०२०–२५४४७६२०/७६२१

वेबसाईट– www.bhagininivedita.bank.in ई–मेल– ho@bhagininivedita.bank.in

## ग्राहकांसाठी महत्त्वाची सूचना

## KYC कागदपत्रे पुन:श्च अद्ययावत करणेबाबत

बँकेच्या सर्व खातेदारांना कळविण्यात येते की, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे बँकांना आपल्या खातेदारांची अद्ययावत (Updated) KYC कागदपत्रे प्राप्त करणे बंधनकारक आहे. तसेच Prevention of Money Laundering Act 2002 च्या तरतुदीनुसार ग्राहकांना देखील KYC कागदपत्रे बँकेस वेळोवेळी देण्याचे बंधनकारक आहे. तरी ग्राहकांनी पुन:श्च KYC कागदपत्रे त्वरीत सादर करुन बँकेस सहकार्य करावे.

बचत व चालू खात्यावर मागील २ वर्षे व्यवहार झाला नसल्यास सदर खाती Inoperative मध्ये व १० वर्षे व्यवहार झाले नसल्यास सदर खाती DEAF मध्ये वर्ग करावी लागतात. काही कारणांनी खात्यावर व्यवहार झाले नसल्यास आपली अद्ययावत KYC पूर्तता लवकरात लवकर करून खात्यावर व्यवहार पुन्हा सुरु करण्यात यावेत.

KYC साठी आवश्यक कागदपत्रे – आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, वाहन चालवण्याचा परवाना, मनरेगा ओळखपत्र, एन.पी.आर. ओळखपत्र (यापैकी कोणतेही १) तसेच २ फोटो, पॅनकार्ड, मोबाईल क्रमांक व ई – मेल इ. अधिक माहितीसाठी ग्राहकांनी आपल्या शाखेशी त्वरीत संपर्क साधून वरील प्रमाणे पूर्तता करावी ही विनंती.

ज्या ग्राहकांनी वरीलप्रमाणे KYC कागदपत्रांची पूर्तता केलेली नसेल, त्यांनी कृपया **दि.३०.०६.२०२६** पर्यंत शाखेशी संपर्क साधावा.

ग्राहकांना उत्तमोत्तम सेवा देण्यासाठी आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे.

आपल्या खात्यासाठी फॉर्म नं. ६० अथवा पॅन क्रमांक पूर्तता झालेली नसल्यास **दि.०१.०७.२०२६** पासून सदर पूर्तता होईपर्यंत तात्पुरते खात्यावर दैनंदिन व्यवहार करता येणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी व याची सर्वस्वी जबाबदारी खातेदारांची राहील.

मुख्य कार्यकारी अधिकारी

दि. २८.०५.२०२६ भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित, पुणे.